९७

# महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

## महाराष्ट्र अधिनियम नं.१४/२००४

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४

(As Modified upto the 4th June, 2011)

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४

## अनुक्रमणिका


| कलम | तपशील |
|---|---|
| | प्रस्तावना |
| १ | संक्षिप्त नांव व प्रारंभ |
| २ | व्याख्या |
| ३ | संस्थान विश्वस्तव्यवस्थेची पुनर्घटना आणि त्या विश्वस्तव्यवस्थेकडे मालमत्ता हस्तांतरित व निहित होणे. |
| ४ | मालमत्तेचा ताबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरित होणे. |
| ५ | संस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती घटित करणे. |
| ६ | सदस्यांचे भत्ते |
| ७ | सदस्यांचा पदावधी |
| ८ | सदस्य असण्यासाठीच्या शर्ती |
| ९ | सदस्यत्वासाठी अनर्हता |
| १० | नवीन सदस्य नेमण्याचा अधिकार |
| ११ | समितीच्या सभा आणि कार्यपध्दतीचे नियम |
| १२ | ~~जागा रिकामी राहिल्याने किंवा दोष राहिल्याने समितीचे~~ कृत्य विधिअग्राहय न ठरणे. |
| १३ | समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी |
| १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये |
| १५ | कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती |
| १६ | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे. |
| १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार |
| १८ | सल्लागार परिषद |
| १९ | भक्तमंडळ |
| २० | विश्वस्तव्यवस्था निधी |
| २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग |
| २२ | व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग |
| २३ | विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांच्यातर्फे किंवा त्यांच्या विरुध्द दावे व इतर कार्यवाही |

| कलम | तपशील |
|---|---|
| २४ | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेतर्फे किंवा तिच्या विरुध्दची कायदेशीर कार्यवाही चालू ठेवणे आणि त्या विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या निर्देशांचा अर्थ लावणे. |
| २५ | नियम |
| २६ | निदेश देण्याचे, अहवाल, दस्तऐवज इत्यादी मागविण्याचे शासनाचे अधिकार |
| २७ | शासनाने निरीक्षण करणे |
| २८ | अभिलेख, इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार |
| २९ | समितीचा वार्षिक अहवाल |
| ३० | विवक्षित प्रकरणी समितीचा कोणताही ठराव अथवा आदेश, इत्यादी तहकूब किंवा खंडित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार |
| ३१ | विश्वस्तव्यवस्थेच्या समितीचे सदस्य आणि अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे. |
| ३२ | सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण |
| ३३ | इतर कायदे, इत्यादीवर अधिनियम अधिभावी असणे. |
| ३४ | समितीचे विसर्जन व अधिक्रमण |
| ३५ | अडचणी दूर करणे |

20

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑगष्ट १७, २००४/ श्रावण २६, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

## अ नु क्र म णि का

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.--मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावे नोंदणी झालेली श्री शिर्डी साईबाबा संस्थानाची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम ३४

दिनांक १४ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधान मंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

(मा.राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १७ ऑगस्ट २००४ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील "श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावे नोंदणी झालेली श्री शिर्डी साईबाबा संस्थानाची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावे नोंदणी झालेल्या व श्री शिर्डी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी म्हणून ओळखल्या जाणा-या श्री शिर्डी साईबाबा संस्थानाच्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन हे, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई, याने १९६० चा धर्मादाय वाद क्रमांक ३४५७ मध्ये, दिनांक १८ ऑक्टोबर १९८२ रोजी दिलेल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाने, १९८३ च्या प्रथम अपील क्रमांक ३२० मध्ये, दिनांक २३ जुलै १९८४ रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे, कायम केलेल्या त्यांच्या आदेशान्वये तयार केलेल्या योजनेनुसार, व्यवस्थापन मंडळाकडे निहित केले आहे,

आणि ज्याअर्थी, श्री साईबाबा शिर्डी संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या पूर्वीच्या व्यवस्थापन मंडळाची पाच वर्षांची मुदत संपल्यावर, धर्मादाय आयुक्तांनी, दिनांक ३१ ऑगस्ट १९९९ च्या त्यांच्या आदेशान्वये उक्त विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन मंडळ पुनर्घटित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, विश्वस्तांच्या नियुक्तीच्या संबंधातील धर्मादाय आयुक्तांच्या दिनांक ३१ ऑगस्ट १९९९ च्या उक्त आदेशाने बाधित झाल्यामुळे, १९९९ चे दोन रिट विनंती अर्ज क्रमांक २८६६ आणि २८६७ मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते, आणि उच्च न्यायालयाने विश्वस्तांपैकी एका विश्वस्ताची नियुक्ती रद्दबातल ठरवून ती रद्द केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विश्वस्तव्यवस्थेकडे अमाप मालमत्ता आहे आणि ती विश्वस्तव्यवस्था खूप लोकप्रिय आहे आणि ती अतिशय आदरणीय मानली आहे आणि तिचे भक्तगण संपूर्ण भारतभर खूप मोठ्या संख्येने आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, या महत्वपूर्ण आणि लोकप्रिय विश्वस्तव्यवस्थेच्या विकासात व व्यवस्थापनात अडचणी येऊ नयेत किंवा टाळता येण्याजोग्या खटल्या कज्जांना कोणत्याही प्रकारे सामोरे जावे लागू नये याकरिता आणि विश्वस्तव्यवस्थेस, आपले धर्मादाय कार्यक्रम अधिक परिणामकारकरितीने आणि कार्यक्षमतेने पार पाडणे आणि त्यांच्या भक्तांना अधिक सुविधा देणे शक्य व्हावे म्हणून, आणि सर्वसामान्य जनतेसाठी आपल्या अतिरिक्त निधीतून अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून उक्त विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्यासाठी आणि राज्य शासनाच्या थेट देखरेखीखालील व नियंत्रणाखालील समितीमार्फत त्याचे कार्यक्षम व्यवस्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी स्वतंत्र कायदा असणे, इष्ट वाटते; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:--

संक्षिप्त नांव व प्रारंभ. १. *(१) या अधिनियमास, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.*

*(२) तो, दिनांक २३ ऑगस्ट २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.*

व्याख्या २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) "सल्लागार परिषद" याचा अर्थ, कलम १८ अन्वये घटित केलेली श्री साईबाबा संस्थान सल्लागार परिषद, असा आहे;

(ख) "नियत दिवस" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये नियत केलेला दिवस असा आहे;

(ग) "भक्त मंडळ" याचा अर्थ, कलम १९ अन्वये निर्देशिलेले आणि मान्यताप्राप्त असलेले भक्त मंडळ, असा आहे;

(घ) "समिती" याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित केलेली श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती, असा आहे;

(ङ) "कार्यकारी अधिकारी" याचा अर्थ, समितीचा कार्यकारी अधिकारी असा आहे;

(च) "व्यवस्थापन निधी" याचा अर्थ, कलम २२ अन्वये घटित केलेला व्यवस्थापन निधी, असा आहे;

(छ) " सदस्य" याचा अर्थ समितीचा सदस्य, असा आहे. आणि त्यात, समितीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा समावेश होतो;

(ज) " विहित" याचा अर्थ, राज्य शासनाने, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(झ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम, असा आहे;

(ञ) "संस्थान" याचा अर्थ, श्री शिर्डी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी म्हणून प्रख्यात असलेले व शिर्डी साईबाबा मंदिर विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीचे असलेले श्री शिर्डी साईबाबा संस्थान, असा आहे;

(ट) " संस्थान विश्वस्तव्यवस्था" किंवा " विश्वस्तव्यवस्था" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), असा आहे;

*(ट१) "छाननी समिती" याचा अर्थ, कलम २१ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये घटित केलेली छाननी समिती, असा आहे; "*

(ठ) "विश्वस्तव्यवस्था निधी" याचा अर्थ, कलम २० अन्वये घटित करण्यात आलेल्या संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा निधी, असा आहे;

(ड) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यांमध्ये त्यांना नेमून दिलेले ते ते अर्थ असतील. (१९५० चा मुंबई २९)

(१९५० चा मुंबई २९) ३. (१) नियत दिवशी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये, शिर्डी जिल्हा अहमदनगर येथील "श्री साईबाबा शिर्डी संस्थान"या नावे नोंदणी झालेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेऐवजी (यात यापुढे जिचा निर्देश " पूर्वीची विश्वस्तव्यवस्था" असा करण्यात आला आहे), "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)" या नावाची विश्वस्तव्यवस्था ही, या अधिनियमान्वये पुनर्घटित करण्यात आल्याचे मानण्यात येईल. (संस्थान विश्वस्तव्यव पुनर्घटना व त्या विश्वस्तव्यवस्थेकडे मालमत्ता हस्तांतरित निहित होणे)

(२) नियत दिवशी, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांसह), या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरित व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास, त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल.

४. (१) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन मंडळ आणि संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे कलम ३ अन्वये निहित झालेली, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची कोणतीही स्थावर मालमत्ता ताब्यात असणारी इतर प्रत्येक व्यक्ती, ती मालमत्ता, त्यावरील जंगम मालमत्तेसह आणि तिच्या पूर्ण वस्तूसूचीसह, समितीच्या वतीने, कार्यकारी अधिका-याकडे ताबडतोब सुपूर्द करील परंतु कोणत्याही बाबतीत, एक महिना किंवा समितीकडून लेखी परवानगी देण्यात येईल अशी त्याहून जास्त कालावधी यापेक्षा अधिक उशीर करणार नाही; (मालमत्तेचा ताबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरित होणे.)

(२) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन मंडळ आणि बँकांतील ठेवी किंवा शेअर्समधील गुंतवणूकींच्या स्वरुपात असलेली, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची कोणतीही जंगम मालमत्ता ताब्यात असणारी इतर प्रत्येक व्यक्ती, नियत दिवसापासून तीस दिवसांच्या किंवा समिती परवानगी देईल अशा एकूण साठ दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीच्या आत, अशी मालमत्ता, संपूर्ण वस्तुसूचीसह समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-याकडे हस्तांतरित करील किंवा हस्तांतरित करण्याची व्यवस्था करील.

(३) कार्यकारी अधिकारी, कलम ३ अन्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहित केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशीलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सूची तयार करील आणि तिची प्रत, नियत दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, यांच्याकडे सादर करील, मालमत्तांची मूळ सूची संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल.

28



परंतु, राज्य शासनाने असा राजीनामा स्वीकारीपर्यंत, तो अंमलात येणार नाही.

(३) समितीची परवानगी न घेता, जर एखादा सदस्य समितीच्या लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहिला तर, तिसरी सभा यथोचितरीत्या समाप्त झाल्याच्या वेळेपासून, तो त्या समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

सदस्य असण्यासाठीच्या शर्ती.

८. समितीचा सदस्य म्हणून नियुक्त केली जाणारी व्यक्ती :-

(क) महाराष्ट्र राज्यातील कायमची रहिवासी असेल; आणि

(ख) श्री साईबाबांची भक्त असेल अणि ती आपल्या नियुक्तीपूर्वी, सदस्य म्हणून, निर्धारित नमुन्यामध्ये तसे प्रतिज्ञापत्र देईल.

सदस्यत्वासाठी अनर्हता.

९. (१) एखादी व्यक्ती-

(क) अज्ञान असेल;

(ख) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले असेल;

(ग) अविमुक्त नादार असेल;

(घ) संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेशी संबंधित अशा भाडेपट्टयात किंवा कोणत्याही इतर व्यवहारात, तिचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हितसंबंध असेल;

(ङ) कलम ६ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज ती समितीचा पगारी नोकर असेल किंवा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात या समितीला माल पुरविण्यासंबंधीच्या किंवा समितीने हाती घेतलेले कोणतेही काम पार पाडण्यासंबंधीच्या किंवा कोणतीही सेवा देण्यासंबंधीच्या कोणत्याही संविदेत तिचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;

(च) कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल दोषी असेल किंवा तिच्यावर नैतिक अध:पाताच्या अंतर्भाव असलेल्या अपराधासाठी दोषारोपपत्र दाखल झाले असेल किंवा ती अन्यथा अयोग्य असल्याचे आढळून आले असेल;

तर, ती सदस्य म्हणून नेमली जाण्यास किंवा असण्यास अपात्र ठरेल.

(२) एखादा सदस्य पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे अपात्र झाला आहे, असे राज्य शासनास आढळून आल्यास, राज्य शासनास अशा सदस्यास कारण दाखविण्याची संधी दिल्यानंतर आणि असे कोणतेही दाखवलेले कारण विचारात घेतल्यानंतर, अशा सदस्यास सदस्यपदावरुन काढून टाकता येईल आणि राज्य शासनाचा तो निर्णय अंतिम असेल.

नवीन सदस्य नेमण्याचा अधिकार

१०. जेव्हा एखादा विद्यमान सदस्य,--

(क) राजीनामा देईल किंवा मरण पावेल;

(ख) समितीकडून परवानगी घेतल्याशिवाय सतत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी भारताबाहेर राहील;

(ग) परदेशात वास्तव्य करण्याच्या प्रयोजनार्थ भारत सोडून जाईल;

(घ) कार्यमुक्त होऊ इच्छित असेल;

(ङ) असा सदस्य म्हणून कार्य करण्यास नकार देईल किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्यात हयगय करील;

(४) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कोणतीही मालमत्ता सुपूर्द किंवा हस्तांतरित करण्यात आली असेल त्याबाबतीत, कार्यकारी अधिकारी वस्तुसूचीची यथोचित पडताळणी केल्यानंतर हस्तांतरकास त्याची योग्य ती लेखी पावती देईल आणि त्यानंतर, अशा मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी कार्यकारी अधिकारी जबाबदार असेल.

(५) पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन मंडळ आणि पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची कोणतीही मालमत्ता, जिने कार्यकारी अधिका-याकडे सुपूर्द किंवा हस्तांतरित केलेली असेल आणि त्याबद्दल त्याची पोट-कलम (४) अन्वये पावती घेतलेली असेल अशी इतर प्रत्येक व्यक्ती यांचे त्या मालमत्तेसंबंधातील सर्व हिशेब, वाद किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही, हक्कमागण्या व मागण्या किंवा दायित्व यांपासून क्षतिपूरण होईल व त्यापासून त्या भारमुक्त व मुक्त होतील.

संस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती घटित करणे.

५. (१) संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनासाठी, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नियत दिवशी किंवा त्यानंतर राज्य शासनाकडून "श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती" नावाची एक समिती घटित करण्यात येईल.

(२) राज्य शासन, पोट-कलम (१) अन्वये अभिप्रेत असल्याप्रमाणे समिती घटित करण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि जास्तीत जास्त *पंधरा* अन्य सदस्य यांची नियुक्ती करुन एक समिती बनवील:

परंतु, सदस्यांच्या एकूण संख्येपैकी एकपेक्षा कमी नसतील एवढे महिला सदस्य असतील आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील एक सदस्य असेल.

*"परंतु आणखी असे की, एकूण सदस्य संख्येपैकी आठ सदस्यांहून कमी नसतील इतके सदस्य (उपाध्यक्षासह) हे, कायदा, व्यवसाय व्यवस्थापन, लोकप्रशासन, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकशास्त्र किंवा ग्रामीण विकास यांसारख्या एका किंवा त्याहून अधिक क्षेत्रांतील शैक्षणिक पार्श्वभूमीसह व्यावसायिक किंवा विशेषीकृत ज्ञान, अर्हता आणि प्रत्यक्ष अनुभव असणा-या व्यक्ती असतील."*

(३) शिर्डी नगर पंचायतीचा अध्यक्ष हा समितीचा पदसिध्द सदस्य असेल.

(४) या अधिनियमाच्या इतर तरतुदींस अधीन राहून, ही समिती उपरोक्त नावाने ओळखला जाणारा एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि एक सामाईक मुद्रा असेल आणि तिला स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल, आणि तिच्या उक्त नावाने तिला किंवा तिच्यावर दावा करता येईल.

सदस्यांचे भत्ते

६. (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष, किंवा यथास्थिति, समितीचे सदस्य म्हणून प्रत्येक सदस्यास, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील असे मानधन, फी व भत्ते, व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, एखादा सदस्य हा या समितीचा सदस्य आहे किंवा त्यास या कलमान्वये कोणतेही मानधन, फी किंवा भत्ते मिळतात याच केवळ कारणावरुन, तो राज्य विधानमंडळाचा किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य बनण्यास अपात्र ठरणार नाही.

सदस्यांचा पदावधी

७. (१) सदस्यांची नेमणूक ही तीन वर्षांच्या कालावधीसाठी असेल:

परंतु, अशा मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, नवीन समिती स्थापन करणारी अधिसूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकापर्यंत वाढवला गेल्याचे व त्या दिनांकास समाप्त होत असल्याचे मानण्यात येईल.

(२) सदस्यास, आपल्या सहीने लेखी, राज्य शासनास संबोधून आणि त्याची एक प्रत अध्यक्षास पाठवून आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देता येईल:

(च) राज्य शासनाकडून काढून टाकला जाईल किंवा त्याचे सदस्यत्व समाप्त केले जाईल;

(छ) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार सदस्य असण्याचे किंवा सदस्य म्हणून पुढे चालू राहण्याचे बंद होईल किंवा तो अनर्ह होईल;

तेव्हा राज्य शासनास, नवीन सदस्याची नेमणूक करता येईल.

समितीच्या सभा आणि कार्यपध्दतीचे नियम.

११. (१) समिती, आपले कामकाज चालवण्यासाठी, वेळोवेळी, ती ठरवील अशा कालांतराने, अशा वेळी सभा भरवील, तथापि, दोन सभांमध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक काळ जाणार नाही.

(२) समितीच्या सभेची गणपूर्ती *आठ* सदस्यांनी होईल.

(३) समितीच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षपदी, अध्यक्ष व त्याच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष आणि त्यांच्या अनुपस्थितीत, उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्या प्रयोजनासाठी निवडलेला सदस्य असेल.

(४) समितीच्या सभेत उपस्थित होणा-या सर्व प्रश्नांचा निर्णय उपस्थित असणा-या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल. समसमान मते पडतील त्याबाबतीत, अध्यक्षास किंवा, यथास्थिति, अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत वापरण्याचा हक्क असेल.

(५) कलम १३ अन्वये नियुक्त केलेला कार्यकारी अधिकारी हा समितीचा सचिव म्हणून काम पाहील आणि तो, प्रत्येक सभेच्या कामकाजाची-अध्यक्षाने-किंवा-सभेच्या-अध्यक्षपदी-असलेल्या-इतर कोणत्याही सदस्याने यथोचितरीत्या स्वाक्षरित केलेली कार्यवृत्ते ठेवण्यास जबाबदार असेल.

(६) समितीस, आपल्या कार्यपध्दतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्यातील नियमांशी सुसंगत होतील असे विनियम करता येतील.

जागा रिकामी राहिल्याने किंवा दोष राहिल्याने समितीचे कृत्य विधिअग्राह्य न ठरणे.

१२. समितीचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे, समितीच्या सदस्यांमधील एखादी जागा रिकामी आहे किंवा तिच्या घटनेत अथवा कोणत्याही सदस्याच्या नेमणुकीत दोष आहे, याच केवळ कारणावरुन विधिअग्राह्य ठरणार नाही.

समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी.

१३. (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, एका कार्यकारी अधिका-याची नेमणूक करील. या बाबतीत राज्य शासनाने, काढलेल्या एखाद्या आदेशाद्वारे त्याचा पदावधी निश्चित केला नसल्यास, तो, ते पद त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून सामान्यपणे तीन वर्षांच्या कालावधीकरिता धारण करील:

परंतु, नियत दिवसाच्या लगतपूर्वी पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेचा कार्यकारी अधिकारी म्हणून काम करणारी व्यक्ती, या पोट-कलमाअन्वये राज्य शासनाकडून कार्यकारी अधिका-याची नेमणूक करण्यात येईपर्यंत तशा प्रकारे काम करणे चालू ठेवील, आणि ती या अधिनियमाखालील कार्यकारी अधिका-याची कर्तव्ये व कार्ये पार पाडील.

(२) कार्यकारी अधिका-याची निवड ही, उप जिल्हाधिका-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-यांमधून करण्यात येईल:

परंतु, असा अधिकारी श्री साईबाबांचा भक्त असेल व तो विहित केलेल्या नमुन्यात तसे प्रतिज्ञापत्र देईल.

(३) आजारपण किंवा रजा किंवा यांसारख्या इतर कोणत्याही कारणावरुन कार्यकारी अधिका-याचे पद तात्पुरते रिकामे होईल तेव्हा, कार्यकारी अधिका-याच्या अनुपस्थितीच्या कालावधीसाठी सुयोग्य व्यक्तीची नेमणूक करुन ते पद राज्य शासनाला भरता येईल.

(४) समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतिबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही.

समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये.

१४. (१) कार्यकारी अधिकारी हा, समितीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असेल. त्यास, समितीच्या सर्वसाधारण नियंत्रणास अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समितीचे निर्णय अंमलात आणण्याचे अधिकार असतील.

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, कार्यकारी अधिकारी, विश्वस्तव्यवस्थेची सर्व मालमत्ता व अभिलेख यांच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल आणि तो, मंदिरास देण्यात येणा-या अर्पणवस्तू गोळा करुन त्या ठेवण्याची योग्य ती व्यवस्था करील आणि समितीच्या नियंत्रणास अधीन राहून, त्या कार्यकारी अधिका-यास,--

(क) समितीच्या कोणत्याही अन्य अधिका-याविरुध्द किंवा कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे;

(ख) बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठ्यासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मूल्य पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्वीकारण्याचे;

(ग) नाशवंत अर्पणवस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे;

(घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे;

(ङ) जी कृत्ये व गोष्टी करण्यासाठी समितीचे त्यास अधिकार प्रदान केलेले आहेत किंवा विनियमान्वये असे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत, ती इतर सर्व कृत्ये व गोष्टी करण्याचे, अधिकार असतील.

(३) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी समितीकडून किंवा कार्यकारी अधिका-याकडून किंवा विनियमान्वये त्यांना वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती

१५. (१) समितीचा कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तींवर नेमण्यात येईल.

(२) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी हे, विनियमांद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तींवर नेमण्यात येतील.

(३) समितीच्या कार्यकारी अधिका-याचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे, व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्त-व्यवस्थेकडे नेमून देणे.

१६. नियत दिवसाच्या लगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तींवर, नियत दिवसापासून, समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तींमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही:

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

समितीची कर्तव्ये व अधिकार.

१७. (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, समिती,--

(क) विश्वस्तव्यवस्थेच्या जमाखर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील;

(ख) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा व जमाखर्चाचा योग्य लेखा व अभिलेख ठेवील;

(ग) विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील;

(घ) समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील;

(ड.) विश्वस्तव्यवस्थेच्या गहाळ झालेल्या मालमत्तेची किंवा विश्वस्तव्यवस्थेला येणे असलेल्या रकमांची वसूली करण्यासाठी उपाययोजना करील;

(च) विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील;

(छ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची, वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील, आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास, ते दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील;

(ज) राज्य शासन वेळोवेळी फर्मावील अशी, विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधातील विवरणे, आकडेवारी, हिशेब व इतर माहिती पुरवील;

(झ) सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील;

*"(ज) संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन व व्यवस्थापन यांच्याशी संबंधित बाबींकरिता तिला सल्ला देण्यासाठी, आवश्यक वाटल्यास, तिच्या सदस्यांची किंवा बाहेरील व्यक्तींची उपसमिती घटित करील आणि त्याचबरोबर तिची रचना आणि सभा घेण्याबाबतची कार्यपध्दती आणि समिती सदस्यांहून अन्य असतील अशा, उपसमितीच्या सदस्यांना बैठक भत्ता आणि प्रवास भत्ता व दैनिक भत्ता यांचे प्रदान करण्याच्या तरतुदींसह, तत्संबंधित बाबींची कार्यपध्दतीही निर्धारित करील; आणि आपल्या कार्यामध्ये सहाय्य करण्यासाठी छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे तिला सनदी लेखापालाची नियुक्तीही करता येईल: आणि कलम २१ च्या पोट-कलम (२) अन्वये, कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेला संस्थान विश्वस्तव्यवस्थेने मंजूर केलेल्या वित्तीय सहाय्याचा योग्य, पूर्णांशाने तसेच वेळेवर विनियोग होत आहे यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी व ते समितीला कळवण्यासाठी, विशेषीकृत व व्यावसायिक ज्ञान असलेल्या क्षेत्रातील तिच्या सदस्यांमधून पाचपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची उपसमितीही नियुक्त करता येईल आणि अशा विश्वस्तव्यवस्थांकडून वित्तीय सहाय्याचा कोणताही दुर्विनियोग होत असेल तर ते मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये आवश्यक ती शिस्तविषयक किंवा शिक्षार्थ कारवाई करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांना कळवील;".*

(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमिनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील;

(ठ) श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

(ड) श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल;

(ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील;

(ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

(३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

(४) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

(५) राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, समितीला कोणत्याही व्यक्तींकडून किंवा पक्षाकडून कर्जाऊ पैसे घेण्याचे अधिकार असणार नाहीत.

(६) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

१८. (१) समितीला सल्ला देण्याकरिता पुढील पदसिध्द-सदस्यांची बनलेली एक सल्लागार परिषद असेल:-- सल्लागार परिषद.

(एक) समितीचा अध्यक्ष;

(दोन) अहमदनगर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी;

(तीन) अहमदनगर जिल्ह्याच्या शिर्डी क्षेत्रासाठीचा पोलीस अधीक्षक;

(चार) जिल्हा सरकारी वकील, अहमदनगर;

(पाच) विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग;

(सहा) शिर्डी नगर पंचायतीवर अधिकारिता असलेला कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग;

(सात) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा कार्यकारी अभियंता, कार्यचालन व परिरक्षण विभाग, संगमनेर;

(आठ) जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर; आणि

(नऊ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी.

(२) समितीचा अध्यक्ष हा सल्लागार परिषदेचा पदसिध्द अध्यक्ष असेल.
(३) कार्यकारी अधिकारी हा, सल्लागार परिषदेचा सचिव म्हणून काम करील.
(४) सल्लागार परिषदेचे कार्य व कर्तव्ये ही विनियमांद्वारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील. सल्लागार परिषद आपल्या बैठकींमध्ये कामकाज पार पाडण्याबाबतची (गणपूर्तीसह) विनियमांद्वारे निर्धारित करुन देण्यात येईल अशी, कार्यपध्दती अनुसरील.

भक्त मंडळ

१९.(१) समारंभ, उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी, आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल. सदस्यत्वाच्या प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांद्वारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असले तरी, भक्त मंडळाचे सदस्यत्व देण्यात येईल:

परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पूर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्त मंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्ये विनियमांद्वारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील. समिती, भक्त मंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या इतर अटी व शर्ती देखील विनियमांद्वारे निर्धारित करुन देईल.

विश्वस्त-व्यवस्था निधी.

२०. (१) संस्थानाच्या विश्वस्तव्यवस्थेचा स्वतःचा निधी असेल, त्याला "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था निधी" असे संबोधण्यात येईल.

(२) पुढील गोष्टी विश्वस्तव्यवस्था निधीचा भाग होतील किंवा विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये भरण्यात येतील:-

(क) कलम ३ च्या तरतुदींच्या आधारे संस्थान विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित असलेले सर्व निधी;

(ख) संस्थान विश्वस्तव्यवस्थेला अर्पणवस्तू, भेटवस्तू किंवा देणग्या या रुपाने मिळालेल्या किंवा पूजा आकार म्हणून मिळालेल्या किंवा वस्तुरुपाने मिळालेल्या वस्तूंच्या लिलावाद्वारे केलेल्या विक्रीचे उत्पन्न म्हणून मिळालेल्या सर्व रकमा;

(ग) विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेपासून मिळालेले उत्पन्न आणि अशा कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीपासून, भाडेपट्ट्यांपासून किंवा इतर हस्तांतरणापासून किंवा गहाणापासून मिळालेले उत्पन्न;

(घ) शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने, विश्वस्तव्यवस्थेने किंवा इतर संस्थेने किंवा पक्षाने किंवा व्यक्तीने, या विश्वस्तव्यवस्थेला दिलेली कोणतीही अंशदाने किंवा अनुदाने;

(ड.) विश्वस्तव्यवस्थेला येणे असलेल्या आणि समितीने वसूल केलेल्या कोणत्याही रकमा; आणि

(च) विश्वस्तव्यवस्थेकरिता किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने, समितीला किंवा कोणत्याही सदस्याला मिळालेल्या, किंवा समितीने किंवा सदस्याने वसूल केलेल्या कोणत्याही रकमा.

*"(३) विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे "सार्वजनिक रोख्यांमध्ये" गुंतवण्यात येतील."*

(४) समितीने प्राधिकृत केलेल्या सदस्यांकडून किंवा अधिकाऱ्यांकडून, विश्वस्तव्यवस्था निधीचा व्यवहार, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, करण्यात येईल.

विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग

*२१. (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:--*

*(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;*

*(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;*

*(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;*

*(घ) भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालवणे;*

*(ङ) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;*

*(च) समितीने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमांची राज्य शासनाच्या मंजुरीने परतफेड करणे;*

*(छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान;*

*(ज) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान;*

*(झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;*

*(ञ) भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे; आणि*

*(ट) कलम १७ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडणे.*

*(१क) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.*

(२) पोट-कलमे (१) आणि *(१क)* मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:--

*(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी; किंवा*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी:*

*परंतु, राज्य शासन, या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्वमान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली, असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील; आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल:*

*परंतु, आणखी असे की, छाननी समिती आपल्या सभांचे आयोजन करण्यासाठी व कामकाज पाहण्यासाठी, आणि, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी विनियम तयार करील तसेच संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी, या अधिनियमाखाली, विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जाची शिफारस करण्यासाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयाने, केवल आर.सेमलानी यांच्या प्रकरणामधील रिट विनंतीअर्ज क्र.२००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निदेश आणि मार्गदर्शक तत्त्वे यांना अनुरुप अशी, मार्गदर्शक तत्त्वे तयार करुन ती प्रकाशित करील. ".*

**व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग**

२२.(१) व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी घटित करण्यात येईल व तो समितीकडे निहित असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

(२) व्यवस्थापन निधीत, शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्त-व्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निदेश देता येईल.

(३) व्यवस्थापन निधीचा राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील प्रयोजनांसाठी उपयोग करण्यात येईल:--

(क) समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य *आणि छाननी समितीचा अध्यक्ष आणि कलम १७ च्या खंड (ञ) अन्वये घटित करण्यात आलेल्या उप-समितीचे बाहेरील सदस्य यांना* मानधन, फी व भत्ते देणे;

(ख) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे;

(ग) या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना अणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

**विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांच्यातर्फे किंवा त्यांच्याविरूध्द दावे व इतर कार्यवाही**

२३. संस्थान विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांनी दाखल केलेले किंवा त्यांच्याविरुध्द दाखल केलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही यांमध्ये, युक्तिवादाच्या कागदपत्रावर कार्यकारी अधिकारी सही करील व ते सत्यापित करील आणि अशा दाव्यांमधील व कार्यवाहीतील सर्व आदेशिका, कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नांवे काढण्यात किंवा त्यांच्यावर बजावण्यात येतील.

**सार्वजनिक विश्वस्त-व्यवस्थेतर्फे किंवा तिच्याविरुध्दची कायदेशीर कार्यवाही चालू ठेवणे आणि त्या विश्वस्त-व्यवस्थेसंबंधीच्या निर्देशांचा अर्थ लावणे.**

२४.(१) जेथे शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील "श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावाची पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही, किंवा तिचा कोणताही विश्वस्त हा, नियत दिवसाच्या लगतपूर्वी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)" या नावाने कलम ३ अन्वये पुनर्घटित करण्यात आलेल्या विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित कोणत्याही मालमत्तेच्या, हक्कांच्या, दायित्वांच्या किंवा बंधनाच्या संबंधातील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत एक पक्षकार असेल त्या बाबतीत, उक्त पुनर्घटित विश्वस्तव्यवस्थेला किंवा तिच्या समितीला, त्या कार्यवाहीतील एक पक्षकार म्हणून, पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त या ऐवजी दाखल करण्यात आले असल्याचे किंवा यथास्थिति, किंवा त्यातील एक पक्षकार म्हणून जादा दाखल करण्यात आले असल्याचे, मानण्यात येईल आणि कार्यवाही तद्नुसार चालू ठेवण्यात येईल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील, विनियमातील, अधिसूचनेतील किंवा आदेशातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा इतर दस्तऐवजातील, पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त याबाबतच्या कोणत्याही निर्देशांचा अर्थ नियत दिवशी किंवा त्यानंतर, संदर्भानुसार दुसरा अन्वयार्थ लावणे आवश्यक नसेल तर, यथास्थिति, कलम ३ अन्वये पुनर्घटित विश्वस्तव्यवस्था किंवा तिची समिती याबद्दलचा निर्देश, असा लावण्यात येईल.

नियम.

२५. (१) या अधिनियमाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा वापर, राज्य शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन, करील.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकाराला बाध न आणता, राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील:

परंतु, तातडीने कृती करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली तर, त्यास, या अधिनियमाखाली करावयाचा कोणताही नियम, पूर्वप्रसिध्दीशिवाय करता येईल.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन, किंवा अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच तो नियम अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

निदेश देण्याचे, अहवाल, दस्तऐवज, इत्यादी मागविण्याचे राज्य शासनाचे अधिकार

२६.(१) राज्य शासनास, समितीचे अधिकार व कर्तव्ये याच्या संबंधात तिने अनुसरावयाच्या धोरणाच्या बाबतीत किंवा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनाच्या बाबतीत किंवा त्यास सहाय्यभूत ठरणा-या किंवा त्यांच्याशी आनुषंगिक असलेल्या कोणत्याही बाबतीत व विशेषत: मंदिरातील किंवा मंदिरासंबधातील उत्सवांमध्ये शिस्त व सुव्यवस्था ठेवण्याच्या प्रयोजनार्थ करावयाच्या कोणत्याही कारवाईच्या बाबतीत समितीस सर्वसाधारण निदेश देता येतील.

(२) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास, संस्थान विश्वस्तव्यवस्थेची योग्य प्रकारे देखभाल व प्रशासन करण्यात येत आहे, आणि संस्थानाचा निधी ज्या प्रयोजनार्थ घटित करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी फक्त त्याचा विनियोग करण्यात येत आहे, याबद्दल आपली खात्री करुन घेण्यासाठी, राज्य शासनाच्या किंवा त्या अधिका-याच्या मते वाजवीरीत्या आवश्यक असेल अशी सर्व माहिती, लेखे किंवा अहवाल मागविता येतील व अशी मागणी केल्यावर, समिती, राज्य शासनास, किंवा यथास्थिती, अशा अधिका-यास अशी माहिती, लेखे किंवा अहवाल ताबडतोब पुरवील.

शासनाने निरीक्षण करणे.

२७. राज्य शासनास, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधातील कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, अभिलेख, पत्रव्यवहार, आराखडे, लेखे व इतर दस्तऐवज यांचे निरीक्षण करण्यासाठी उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिका-याची प्रतिनियुक्ती करता येईल; आणि समिती व तिचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर, अशा निरीक्षणासाठी अशा अधिका-यास सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याचे बंधन राहील.

अभिलेख इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२८.(१) कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचूकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वत:ची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास तसे करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास, त्याप्रमाणे आदेश काढता येतील.

(२) जेव्हा एखाद्या प्रकरणी पोट-कलम (१) खाली राज्य शासनाने कार्यकारी अधिका-याचा किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा अभिलेख मागवला असेल तेव्हा, राज्य शासनास, त्या संबंधात पोट-कलम (१) खाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्यात येईपर्यंत, कार्यकारी अधिका-याच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल:

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, राज्य शासन, पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

समितीचा वार्षिक अहवाल

*२९. (१) समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमाखर्चाचा तपशील दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षकाचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणा-या संस्थांची (संपूर्ण पत्त्यासह) तपशीलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम यांबाबतची माहिती सोबत जोडलेला, छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्तांला, त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील.*

*(२) राज्य शासन, पोट-कलम (१) खाली प्राप्त झालेली अहवालाची प्रत, ती प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवील आणि त्याची प्रत किंवा त्यामधील कोणतेही उतारे, त्यांची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला, समिती निर्धारित करील अशी वाजवी फी किंवा आकार प्रदान केल्यावर, विश्वस्तव्यवस्थेकडून दिले जातील. "* .

विवक्षित प्रकरणी समितीचा कोणताही ठराव अथवा आदेश, इत्यादी तहकूब किंवा खंडित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३०.(१) समितीचा कोणताही ठराव, निर्णय अथवा आदेश यांची अंमलबजावणी किंवा समितीकडून किंवा समितीच्या वतीने करण्यात यावयाची असेल किंवा करण्यात येत असेल, अशी कोणतीही कृती जनहिताच्या विरोधात व या अधिनियमाद्वारे वा अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा त्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरुन करण्यात येणारी कृती आहे अथवा त्यामुळे व्यवस्थापन निधीचा दुरुपयोग वा गैरवापर होण्याची किंवा अपव्यय होण्याची शक्यता आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी, अशा ठरावाची वा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करता येईल किंवा अशी कोणतीही कृती प्रतिषिध्द करता येईल. अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाकडून समितीला आणि कार्यकारी अधिका-याला तात्काळ पाठविण्यात येईल.

(२) उपरोक्तप्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर, समितीस, तिला योग्य वाटेल तर, अशी प्रत प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत, उक्त आदेशाविरुध्द राज्य शासनाकडे लेखी अभिवेदन करता येईल.

(३) राज्य शासन,--

(एक) समितीकडून मिळालेल्या कोणत्याही असल्यास, अभिवेदनावर विचार केल्यावर; किंवा

(दोन) असे अभिवेदन तीस दिवसांच्या आत न मिळाल्यास,

एकतर पोट-कलम (१) अन्वये काढलेला आपला आदेश रद्द करील, त्यात फेरबदल करील वा तो कायम करील, किंवा त्या प्रकरणातील सर्व परिस्थिती विचारात घेऊन, त्या प्रकरणाबाबत त्याच्या मते जी न्याय व इष्ट असेल अशी अन्य कार्यवाही करील. पोट-कलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश कायम करण्यात आला असेल त्याबाबतीत, राज्य शासनास, ज्याच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये तहकुबीचा आदेश देण्यात आला होता तो समितीचा ठराव वा आदेश विखंडित केल्याचे मानण्यात येईल, असा निदेश देता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडून कोणताही आदेश काढण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा आदेशाचे पालन करणे हे समितीच्या प्रत्येक सदस्याचे आणि कार्यकारी अधिका-याचे आणि सर्व संबंधित अधिका-यांचे व कर्मचा-यांचे कर्तव्य असेल.

१८६० चा ४५. १९८८ चा ४९. ३१. विश्वस्तव्यवस्थेचे सदस्य आणि सर्व अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २ (ग) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. विश्वस्त-व्यवस्थेच्या समितीचे सदस्य आणि अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

३२. राज्य शासनाने, समितीने किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने, अधिका-याने किंवा कर्मचा-याने या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार आणि विनियमानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, त्याच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण.

१९५० चा मुंबई २९. ३३. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५०, किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यामध्ये किंवा नियत दिवसापूर्वी त्याखाली तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापनाच्या कोणत्याही योजनेमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा धर्मादाय आयुक्ताच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्यां कोणत्याही न्यायनिर्णयांत, हुकूमनाम्यांत किंवा आदेशात किंवा कोणत्याही रुढीत किंवा परिपाठात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात राहतील. इतर कायदे, इत्यादींवर अधिनियम अधिभावी असणे.

३४. (१) या अधिनियमान्वये समितीवर सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास समिती सक्षम नाही किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत आहे, किंवा तिला असलेल्या अधिकारापेक्षा ती जादा अधिकार वापरत आहे किंवा त्यांचा गैरवापर करीत आहे असे जर राज्य शासनाचे मत झाले तर, राज्य शासनास, योग्य ती चौकशी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, उक्त समितीचे विसर्जन करुन विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत दुसरी समिती घटित करता येईल किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी उक्त समितीचे अधिक्रमण करता येईल. समितीचे विसर्जन व अधिक्रमण.

(२) पोट-कलम (१) खाली अधिसूचना प्रसिध्द करण्यापूर्वी, राज्य शासन, ज्या कारणास्तव त्याने तसे करण्याचे योजिले आहे ती कारणे समितीस लेखी कळवील व या प्रस्तावित कार्यवाहीविरुध्द कारण दाखविण्यासाठी समितीस वाजवी वेळ देईल. तसेच समितीने दिलेले स्पष्टीकरण किंवा आक्षेप, कोणतेही असल्यास, त्यावर विचार करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये समिती विसर्जित करण्यात आली असेल किंवा तिचे अधिक्रमण करण्यात आले असेल त्याबाबतीत, राज्य शासन, यथास्थिती, दुसरी समिती घटित होईपर्यंत किंवा अधिक्रमणाचा कालावधी संपेपर्यंत, समितीच्या या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्यशासनाच्या क्रियाशील सेवेत असलेल्या किंवा अशा सेवेमधून निवृत्त झालेल्या आणि श्री साईबाबाचे भक्त असलेल्या आणि विहित नमुन्यात असे प्रतिज्ञापन करतील अशा (जिल्हाधिका-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणा-या) व्यक्तींमधून एका व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक करील.

(४) राज्य शासनास, पोट-कलम (३) अन्वये प्रशासक म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती निश्चित करता येतील व ते व्यवस्थापन निधीमधून देण्यात येईल.

अडचणी दूर करणे. ३५. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करतांना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल:

परंतु, हा अधिनियम लागू झाल्याच्या दिनांकानंतर दोन वर्षे होऊन गेल्यावर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर लवकरात लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.